आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
३० मे २०२५ -शुक्रवार

**ठळक बातम्या**

- बिहारमधे ४८ हजार ५०० कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधा आणि कल्याणकारी प्रकल्पांचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण आणि पायाभरणी

- संरक्षण मंत्रालयाच्या तीन कंपन्यांना मिनीरत्न श्रेणी-१ दर्जा मंजूर

- पंजाबमध्ये फटाक्याच्या कारखान्यात झालेल्या स्फोटात पाच जणांचा तर उत्तरप्रदेशात रस्ते अपघातात चार जणांचा मृत्यू

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघाची अंतिम सामन्यात धडक, आज मुंबई इंडियन्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात लढत

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज बिहारमधल्या काराकट इथं ४८ हजार ५०० कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधा आणि कल्याणकारी प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणी केली. यात साडेपाच हजार कोटी रुपयांचा चौपदरी पाटणा - गया - दोभी महामार्ग, २४९ कोटींचा गोपालगंज महामार्ग यांचाही समावेश आहे. रालोआ सरकार बिहारच्या प्रगतीसाठी सतत प्रयत्नशील आहे, लोकांपर्यंत शांतता, सुरक्षा आणि शिक्षण पोहोचवण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

- **- होल्ड - बाईट मोदी** - -

वाहतूक, ऊर्जा, रेल्वे आदी क्षेत्रांना या प्रकल्पांमुळे लाभ होणार आहे. या कार्यक्रमाच्या सुरक्षेसाठी ५ हजार सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आले होते. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि राज्यपाल आरिफ मोहम्मद खान या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

संरक्षण मंत्रालयानं म्युनिशन्स इंडिया लिमिटेड, आर्मर्ड व्हेइकल्स निगम लिमिटेड आणि इंडिया ऑप्टेल लिमिटेड यांना मिनीरत्न श्रेणी-१ दर्जा मंजूर केला आहे. केवळ तीन वर्षात सरकारी संस्थांमधून नफा कमावणाऱ्या कॉर्पोरेट संस्थांमध्ये रूपांतरित झाल्याबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी तिन्ही सार्वजनिक क्षेत्रातल्या संरक्षण उपक्रमांचं अभिनंदन केलं. कंपनीची उलाढाल वाढवण्यासाठी, संपूर्ण स्वदेशीकरण करण्यासाठी आणि मिनीरत्न दर्जा प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर निकषांची या तिन्ही संस्थांनी पूर्तता केल्याबद्दल सिंह यांनी समाधान व्यक्त केलं. मिनीरत्न दर्जा मिळाल्यामुळे या कंपन्यांना वेगवान वाढीचा मार्ग गाठायला आणि संरक्षण उत्पादन आणि निर्यातीत नवीन उंची गाठायला मदत होईल, असा विश्वास सिंह यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील संबंध विविध क्षेत्रात विस्तारत असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. न्यूझीलंडचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री विन्स्टन पीटर्स यांच्याशी काल नवी दिल्लीत झालेल्या चर्चेनंतर जयशंकर यांनी हे विधान केलं. न्यूझीलंडचे प्रधानमंत्री क्रिस्तोफर लक्सन यांनी नुकतीच भारताला भेट दिली, त्यामध्ये उभय देशांमध्ये मुक्त व्यापार करारासंबंधीच्या वाटाघाटींना सुरुवात झाली तसंच विविध करार करण्यात आले, त्यामुळं त्यांची ही भेट यशस्वी ठरली होती असंही जयशंकर यांनी स्पष्ट केलं. या भेटीत दोन्ही देशांनी ठरविलेली उद्दीष्टं पूर्ण करण्याला सध्या प्राधान्य असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली काल रात्री जम्मूमध्ये झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत जम्मू आणि काश्मीरमधील सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. येत्या ३ जुलैपासून सुरू होत असलेल्या अमरनाथ यात्रेच्या सुरक्षा आणि इतर व्यवस्थेचाही शाह यांनी या बैठकीत आढावा घेतला. या यात्रेसाठी करण्यात आलेल्या सुरक्षा उपाययोजनांबद्दल त्यांना माहिती देण्यात आली. शहा यांचं दोन दिवसांच्या काश्मीर दौऱ्यासाठी काल जम्मूमध्ये आगमन झालं. ते आज पूंछला भेट देणार असून तिथं पाकिस्तानच्या गोळीबारामुळे नुकसान झालेल्या लोकांची ते भेट घेणार आहेत.

<><><><><>

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका जगाला पटवून देण्यासाठी गेलेल्या भारताच्या सर्वपक्षीय शिष्टमंडळाने काल सौदी अरेबियातल्या तीन दिवसांच्या राजनैतिक मोहिमेचा समारोप केला. या शिष्टमंडळाचं नेतृत्त्व भाजपा खासदार बैजयंत पांडा यांनी केलं. त्यांच्या सौदी भेटीदरम्यान, भारतीय प्रतिनिधींनी रियाधमधील गल्फ रिसर्च सेंटरचे अध्यक्ष डॉ. अब्दुल अजीज सागर आणि नायफ अरब युनिव्हर्सिटी फॉर सिक्युरिटी सायन्सेसचे अध्यक्ष डॉ. अब्दुलमाजीद अल्बानयान यांची भेट घेतली.

<><><><><>

केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांनी काल नवी दिल्ली इथं जलशक्ती मंत्रालयाच्या पेयजल आणि स्वच्छता विभागाद्वारे आयोजित देशव्यापी स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण मोहिमेचा प्रारंभ केला. या कार्यक्रमात बोलताना, केंद्रीय मंत्री सी आर पाटील यांनी "मापन ते व्यवस्थापन" या तत्वाचं  महत्व पुन्हा एकदा अधोरेखित केलं. स्वच्छता हे काही काळापुरतं ठरवलेलं  ध्येय नसून हा एक निरंतर प्रवास आहे, असं पाटील म्हणाले.

<><><><><>

गोवा राज्याच्या स्थापनादिवसानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गोव्याच्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. गोव्याची समृद्ध परंपरा, पाहुणचार करण्याची वृत्ती, निसर्गरम्य समुद्रकिनारे यांचा राष्ट्रपतींनी आपल्या समाज माध्यमा वरल्या पोस्टमधे विशेष उल्लेख केला. गोव्याचा समृद्ध वारसा आणि संस्कृती जपण्यासाठी गोव्यातील जनता आणि पर्यटकांनी मिळून काम करावं, असं आवाहन त्यांनी केलं.

<><><><><>

पंजाबमध्ये, श्री मुक्तसर साहिब जिल्ह्यातल्या लांबी भागात काल रात्री उशिरा एका फटाक्याच्या कारखान्यात झालेल्या स्फोटात किमान पाच जणांचा मृत्यू झाला आहे आणि ३४ जण जखमी झाले आहेत. पोलिस उपअधीक्षक जसपाल सिंह यांनी आकाशवाणीला ही माहिती दिली. जखमींची प्रकृती धोक्याबाहेर आहे आणि ते विविध रुग्णालयात उपचार घेत असल्याचंही त्यांनी सांगितलं. स्फोटामागील कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. सध्या

बचावकार्य थांबवण्यात आलं आहे, बहुतेक कारखान्यातील कामगार उत्तर प्रदेश आणि बिहारमधले स्थलांतरित असल्याचं, आमच्या प्रतिनिधीनं सांगितलं.

<><><><><>

उत्तर प्रदेशातल्या जौनपूर जिल्ह्यात आज सकाळी बादलपूरहून जौनपूरला जाणारी एक खाजगी बस उलटल्यानं किमान चार जणांचा मृत्यू आणि १५ जण जखमी झाले आहेत. पोलिस अधीक्षक डॉ. कौस्तुभ यांनी यांनी ही माहिती दिली. प्रत्यक्षदर्शींच्या मते, बस सुमारे ८० किमी प्रतितास वेगाने धावत होती. तेव्हा चालकाचं नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघात झाला. काही प्रवाशांनी बाहेर पडण्यासाठी खिडक्यांच्या काचा फोडल्या, तर काही जण आतच अडकले, असं बचाव कार्यात मदत करणाऱ्या एका स्थानिक रहिवाशानं सांगितलं.

<><><><><>

कर्नाटकमधे मंगळुरू जिल्ह्यात जोरदार पावसामुळे झालेल्या भूस्खलनात एका मुलीचा मृत्यू झाला आहे. तर दोघांना वाचवण्यात यश आलं आहे. ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांना बाहेर काढण्यासाठी बचावकार्य सुरू आहे. मंगळुरू विभागात २ जूनपर्यंत जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

<><><><><>

चालू आर्थिक वर्षात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून भारत आपलं स्थान कायम ठेवेल असं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे. सरकारचा भांडवली खर्चावर भर, खासगी क्षेत्राची वाढ, बँका आणि भांडवली बाजारांचा अचूक ताळेबंद यामुळे भारताची अर्थव्यवस्थेची वाढ कायम राहिल्याचं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे. उत्पादन क्षेत्रात चालू आर्थिक वर्षात वाढ अपेक्षित आहे. यासाठी सरकार सकारात्मक धोरण राबवत असल्याचंही रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे.

<><><><><>

भारत आणि मंगोलियादरम्यान सैन्यदलांच्या सरावाचं मंगोलियाची राजधानी उलानबटार इथं आयोजन करण्यात आलं आहे. उद्यापासून १३ जूनपर्यंत चालणाऱ्या या सरावात दोन्ही दलांदरम्यान परस्पर कार्यपध्दतीचा अभ्यास केला जाणार आहे. नोमॅडिक

एलिफंट नावाच्या सरावाचा हा १७ वा भाग असल्याचं संरक्षण मंत्रालयानं सांगितलं. भारत-मंगोलियादरम्यान हा सैन्यसराव दरवर्षी आयोजित केला जातो.

<><><><><>

केंद्र सरकारच्या कंपनी व्यवहार मंत्रालयाअंतर्गत कार्यरत असलेल्या गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरणाने अर्थात आयईपीएफए ने भारतीय सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्डच्या सहकार्याने गुंतवणूकदार शिबिर' या उपक्रमाची घोषणा केली आहे. आयईपीएफए चं  पहिलं शिबीर १ जून रोजी पुणे इथं होईल.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल चंडिगडमध्ये झालेल्या पात्रता फेरीच्या पहिल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघानं पंजाब किंग्जवर ८ गडी राखून विजय मिळवला आणि स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. पंजाब किंग्ज संघानं दिलेलं १०२ धावांचं आव्हान रॉयल चॅलेंजर्सनं केवळ १० षटकांत दोन गड्यांच्या मोबदल्यात पार केलं.

आज मुंबई इंडियन्स आणि  गुजरात टायटन्स यांच्यात सामना होणार आहे.

//<><><><><>//